ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ५ डिसेंबर, १९५१ अंक ४५

## विविध माहिती

**जपानी लोक हिंदी शिकणार—** जपानी लोकांना हिंदी शिकण्याची सोय करण्यासाठी डॉ. टासी नांवाचे एक जपानी प्रोफेसर नागपूरला येऊन राहिले आहेत. डॉ. रघुवीर ह्यांच्या साह्यानें जपानी लोकांसाठी हिंदीचीं प्राथमिक पुस्तकें ते तयार करणार आहेत. एक जपानी–हिंदी शब्दकोषहि ते तयार करणार आहेत.

**मुंबई बंदरांत विजेचे क्रेन्स—** मुंबईमधील अलेक्झांड्रा गोदींत विजेच्या साह्यानें चालणारे क्रेन्स लवकरच बसविण्यांत येणार आहेत. कलकत्त्याच्या जेसप अँड कंपनीला अशा प्रकारचे ३० क्रेन्स तयार करण्याविषयीं सांगण्यांत आलें आहे. सर्व क्रेन्सना मिळून ७० लाख रुपये पडतील. २४ क्रेन्स प्रत्येकीं ३ टन ओझें उचलणारे व बाकीचे ६ टन वजन उचलणारे असतील.

**कामगारांचा प्रॉव्हिडंट फंड—** भारतीय सरकारनें ६ उद्योगधंद्यांतील कामगारांसाठी सक्तीच्या प्रॉव्हिडंट फंडाची योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ह्या फंडाची बहुतेक रक्कम सरकारी कर्जरोख्यांत गुंतविण्यांत येईल. कापड, लोखंड–पोलाद, सिमेंट, एंजिनिअरिंग व कागद इतक्या वस्तूंच्या कारखान्यांना सरकारचा हुकूम लागू असून सर्व धंद्यांना मिळून २१·४१ कोटींचे सरकारी रोखे प्रॉव्हिडंट फंडासाठी दरसाल खरेदी करावे लागतील असा अंदाज आहे.

**रेल्वेचे डबे बांधण्याचा कारखाना—** मद्रासजवळ पेरांबूर येथें रेल्वेचे डबे बांधण्याचा एक कारखाना उभारण्याचें भारतीय रेल्वेखात्यानें ठरविलें आहे. कारखाना बांधून पुरा होण्यास २ ते ३ वर्षें लागतील. खर्च ४·६३ कोटी रुपये येईल आणि त्यांत दरवर्षी ३५० रेल्वेचे डबे बांधून होतील. चित्तरंजन येथील रेल्वे-एंजिनांचा कारखाना बांधणाऱ्या एंजिनिअर्सकडेच ह्या कारखान्याचें बांधकाम सोंपविण्यांत आलें आहे.

**नेपाळमध्यें राष्ट्रीय बँक—** नेपाळचे फडणीस मेजर जनरल सुबराणा समशेर आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. रामनाथ ह्यांच्यांत नेपाळमध्यें एक सरकारी बँक स्थापन करण्याबाबत नुकत्याच वाटाघाटी झाल्या. नेपाळी रुपया आणि हिंदी रुपया ह्यांच्या हुंडणावळीचा दर ठरविण्याबाबतहि बोलणीं झालीं. सध्यां हा दर खुल्या बाजारांत ठरत असतो व अलीकडे हिंदी रुपयांची किंमत फार वाढूं लागली आहे.

**कलकत्त्याला नवीन प्रयोगशाळा—** इंपिरिअल केमिकल इंडस्ट्रीज (इंडिआ) लि. ह्या कंपनीनें कलकत्ता येथें एक टेक्निकल सर्व्हिस लॅबोरेटरी उघडली आहे. प्रयोगशाळेचें उद्‌घाटन श्री. सी. व्ही. रामन् ह्यांच्या हस्तें झालें. प्लॅस्टिक, रबर, कातडें, इत्यादींबद्दलचें संशोधन प्रयोगशाळेंत होणार आहे. टोळधाडीविरुद्ध वापरण्याचें गॅमेलसेन नांवाचें रसायनहि तयार करण्यांत येणार आहे.

**लग्न जमविणाऱ्या दलालांचें चातुर्य—** वधुवरांची निवड करण्यास सोपें जावें म्हणून लग्न–विषयक दलालांनीं एक नवीनच सोय केली आहे. पुष्कळदां असें होतें कीं वधुवरांची परस्परांना ओळख करून देण्यांत आल्यावरहि त्यांना एकमेकांविषयीं चांगलीशी कल्पना येत नाहीं. ही अडचण दूर करण्यासाठीं विवाहेच्छू वधुवरांच्या बोलण्याचे, चालण्याचे, बोलपट घेऊन ते विवाहेच्छूंना दाखविण्याची सोय दलालांनीं केली आहे.

**भारतामधील पक्षिगणांचा अभ्यास—** भारत व पाकिस्तान ह्यांमधील डोंगरांतून व अरण्यांतून वास्तव्य करणाऱ्या पक्षांचा अभ्यास करण्यासाठी पक्षिशास्त्रज्ञांची एक तुकडी दोन्ही देशांत फिरणार आहे. ह्या तुकडींत दोन ब्रिटिश शास्त्रज्ञ आणि एक हिंदी शास्त्रज्ञ आहे. पाकिस्तानमधील स्वात व चित्रळचे डोंगर आणि भारतामधील राजस्थान, कच्छ, सुंदरवन व मणिपूर हा भाग अभ्यासासाठी निवडण्यांत आला आहे.

**पंजाबमधील तंबाखूची लागवड—** पंजाब राज्यांत १९५०–५१ सालीं एकूण ६,७०० एकर जमिनींत तंबाखूची लागवड करण्यांत आली असावी असा अंदाज आहे. गेल्या वर्षीं ८,००० एकरांत प्रत्यक्ष लागवड करण्यांत आली होती. तंबाखूवरील करांत वाढ केल्यामुळें हा फरक पडला असावा. तंबाखूचें एकूण उत्पादन सुमारें २,५०० टन होईल. गेल्या वर्षीं ३,१०० टन तंबाखू तयार झाली होती.

**टकल्याच्या हजामतीचा दर—** ब्रिटनमधील एका गांवच्या नगराध्यक्षांना चांगलेंच टक्कल पडलेलें होतें. तरीसुद्धां गांवचा नापित त्यांच्याकडून हजामतीसाठीं १ शिलिंग ६ पेन्स घेई. ही गोष्ट अन्याय्य आहे असें वाटून त्यांनीं नापितांच्या मध्यवर्ती संस्थेकडे तक्रार केली कीं, मला फारच कमी केस असतांना इतका आकार कां घेण्यांत यावा ? त्यावर संस्थेच्या अध्यक्षांनीं उत्तर दिलें कीं ९ पेन्स आपल्या डोक्यावरील केस हुडकून काढण्यासाठी व ९ पेन्स ते कापण्यासाठीं घेण्यांत येतात !

**म्हैसूर सरकारला मदत**—मजुरांनां रहाण्यासाठीं घरें बांधतां यावीं म्हणून म्हैसूर सरकारला भारतीय सरकारनें २० लाख रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. खुद्द म्हैसूरचें सरकार १० लाख रुपये खर्च करणार आहे. बंगलोर, भद्रावती, दावणगिरी व म्हैसूर ह्या शहरांतून मजुरांसाठी घरें बांधण्यांत यावयाचीं आहेत. प्रत्येक घराला ३,००० रुपये खर्च येईल.

**कलकत्ता येथील नवी टांकसाळ**—अलीपूर येथें एक नवी टांकसाळ उभारण्याचें काम भारतीय सरकारनें हातीं घेतलें होतें. तें आतां पूर्ण होत आलें असून पुढील वर्षाच्या प्रारंभीं टांकसाळ चालू होईल असा अंदाज आहे. टांकसाळ बांधण्यासाठीं २.२ कोटी रुपये खर्च झाला आहे. ह्या टांकसाळींत रोज १२,५०,००० नाणीं पाडतां येतील.

**उद्बोधक उद्गार**

**कोणाचा प्राण ज्यास्त मोलाचा—**
**आईचा, का मुलाचा?**

"दुसऱ्या एकाद्या उद्दिष्टासाठीं साधन म्हणून कोणत्याहि मानवाचा प्राण घेण्याचा प्रयत्न करणें शास्त्रास सोडून आहे. दुसरा प्राण वांचविण्यासाठींसुद्धा एकाद्या निरपराध्याचा प्राण घेतां कामा नये. मूल आणि आई ह्या दोघांच्याहि प्राणांस हा नियम लागू आहे. आईपेक्षा मुलाच्या प्राणास प्राधान्य देण्यास रोमन कॅथोलिक चर्चनें कोठेंहि सांगितलेलें नाहीं. मुलाचा प्राण विरुद्ध आईचा प्राण, असा विरोध उपस्थितच करतां कामा नये. कोणाच्याहि प्राणास बुद्धिपुरःसर हात लावतां कामा नये. आई आणि मूल ह्या दोघांचाहि प्राण बचावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आईचा जीव वांचविण्याचे प्रयत्नांत मुलाच्या जिवास धोका येतां कामा नये."—पोप पायस १२ वा.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

★ **सारखेच्या धंद्यांत खात्रीचा नफा** ★

—यामुळें—

लक्षाधिशांनीं साखरेचे मोठाले कारखाने भराभर थाटले

लक्षाधिशांना

मांडवलाकरितां जाहिराती द्याव्या लागत नाहींत

महाराष्ट्रीय जनतेच्या आर्थिक साहाय्यानें
सिंडिकेटनें नवीन १००० टनांचा

★ **साखर कारखाना यशस्वी केला** ★

जनतेच्या सोयीप्रमाणें शेअर व ठेवीची पद्धति ठेविली आहे

नवीन मशिनरी, इमारती, ऊंस यांच्यावर
गहाण वगैरे बोजा केलेला नाहीं

शेअर विक्री सुरू आहे

***ठेवींची मुदत १ वर्ष—व्याज ६ टक्के***

शेअर व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. २७ नोव्हेंबर १९५१.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ५ डिसेंबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नपुरवठ्याचा निराशाजनक अंदाज

बंगालमधील भयंकर दुष्काळास आतां आठ वर्षे झालीं, तरी भारताचा अन्नविषयक प्रश्न अद्याप सुटलेला नाहीं, सुटण्याच्या मार्गावर नाहीं, इतकेंच नव्हे तर तो अधिकाधिक बिकट होऊं लागला आहे. रेशनमध्यें हळुहळु वाढ व्हावयाची, त्याऐवजीं कपातच होत गेली आहे आणि परदेशांतून जास्त जास्त धान्य आयात करावें लागत आहे. अन्नाच्या दृष्टीनें भारत स्वयंपूर्ण होण्याची आशा दुरावली आहे. १९५२ च्या अन्नविषयक परिस्थितीचा प्राथमिक अंदाज निराशजनक आहे. हिमाचल प्रदेश व ओरिसा हीं राज्यें सोडलीं तर बाकीच्या सर्व राज्यांस येत्या वर्षी धान्याची तूट भासण्याचा रंग दिसतो. १९५१ मध्यें भारतानें ३० लक्ष टन धान्याची आयात केली, तर १९५१ मध्यें ती ७० लक्ष टनावर जाईल असा अंदाज आहे. वेगवेगळया राज्यांतील धान्यपरिस्थिति कमी-जास्त समाधानकारक असली तरी भारताचें अखंडत्व लक्षांत घेतां वेगवेगळया ठिकाणच्या लोकांना कराव्या लागणाऱ्या उपासमारींत कांहींतरी एकवाक्यता असणें अगत्याचें आहे. तुटीच्या राज्यांतील प्रजेलाच धान्यतुटीचा चटका जास्त बसणें योग्य नाहीं, हें उघड आहे.

१९४१ पासून आतांपर्यंत भारताची लोकसंख्या ४.२ कोटींनीं वाढली आहे. म्हणजे, लोकसंख्येंत १३.४% ची भर पडली आहे. जगांतील सर्व लोक एकामागून चालू लागले, तर प्रत्येक सहांत एक हिंदी इसम असेल, इतकी भारताची लोकसंख्या मोठी आहे. दर महिन्यास ३,५०,००० नवीं जादा तोंडें अन्नासाठी आक्रोश करूं लागतात अशी परिस्थिति असतांना, लोकांची अन्नविषयक गरज भागविणें अधिकाधिक बिकट होणें अपरिहार्य आहे. हिंदी आर्थिक प्रगतीस बाहेरील मदतीची आवश्यकता आहे. परंतु तिचा मोठा भाग धान्याच्या आयातीसाठी खर्ची पडला तर आर्थिक उद्धाराचें पाऊल पुढें पडणें अवघड आहे. स्थानिक उत्पादन व आयात धान्य ह्यांच्या किंमतीमधील तफावत भरून काढण्यासाठी सरकारला कितीतरी कोटी रुपये खर्च येतो. खालील तक्त्यांत हा ताण स्पष्ट दाखविला आहे.

| अखंड भारत | | भारत ( युनियन ) | |
|---|---|---|---|
| वर्ष एप्रिल ते मार्च | कोटी रु. | वर्ष एप्रिल ते मार्च | कोटी रु. |
| १९४४-४५ | १४ | १९४८-४९ | १२० |
| १९४५-४६ | २४ | १९४९-५० | १०७ |
| १९४६-४७ | ८९ | १९५०-५१ | १०२ |
| १९४७-४८ | १०९ | | |

धान्याच्या आयातीसाठी लागणाऱ्या परदेशी हुंडणावळीचा भारताच्या निर्गत व्यापाराच्या मिळकतीशीं संबंध जोडणें उद्‌बोधक होईल.

| | कोटी रु. |
|---|---|
| १९४८-४९ मधील निर्गत व्यापार | ४२३ |
| १९४९-५० मधील निर्गत व्यापार | ४७६ |
| १९४८-४९ मधील धान्य आयात | १२० |
| १९४९-५० मधील धान्य आयात | १०७ |

१९५० च्या दुसऱ्या सहामाहींत झालेली निर्गत-व्यापाराची वाढ ही टिकाऊ स्वरूपाची नाहीं. ही निर्गत कायम रहाणें अशक्य आहे. ज्या निर्गतीच्या जिनसांस भारतांतील मागणीपेक्षां बाहेरच मागणी मोठी आहे, त्यांची गोष्ट वेगळी. परंतु कापड, भुइमूग, भुइमुगाचें तेल, अशा जिनसांच्या निर्गतीचें उत्पन्न बरेंच घटणें अपरिहार्य आहे. अशा परिस्थितींत, आयातीवरील बंधनें कमी करून, परदेशी मालास येथें ज्यास्त वाव करून देणें इष्ट होणार नाहीं. अन्नपुरवठा वाढविणें, बाहेरून धान्य मिळवितां यावें ह्यासाठी शक्य तेवढी परराष्ट्रीय हुंडणावळ वाढवणें व जतन करणें आणि लोकसंख्येच्या वाढीकडे दुर्लक्ष न करणें, अशा तिहेरी उपाययोजनेवर लक्ष केंद्रित झालें, तरच तरणोपाय आहे.

## निवडणूक कायदे व कानू*

हिंदी घटनेमध्यें पार्लमेंट आणि राज्यांतील विधिमंडळें ह्यांच्यावर निवडून जावयाच्या प्रतिनिधींसंबंधीं तपशील 'निवडणुकी' म्हणून स्वतंत्र भाग घटना कायद्यांत घालून दिलेला आहे. घटनेंतील ३२४ पासून ३४२ कलमांत निवडणुकीसंबंधीं माहिती आहे. ह्याखेरीज भारत सरकारनें निवडणुकींविषयक दोन कायदे केले आहेत व त्यांचे अन्वयें मिळालेल्या अधिकारांत निवडणुकी घेण्यासंबंधींची पद्धत व निवडणूक अर्ज ह्यासंबंधींचे कानू प्रसिद्ध केले आहेत. मतदार, मतदानाचे वेळीं काम करणारे सरकारी अधिकारी, उमेदवार व निरनिराळ्या पक्षांचे कार्यकर्ते ह्यांना उपयुक्त अशी माहिती सोप्या शब्दांत श्री. कुलकर्णी ह्यांनीं प्रस्तुत पुस्तकांत दिली आहे. घटनेंतील निवडणूक योजना, लोकप्रतिनिधित्वाचा पहिला कायदा, निवडणुकींतील लायकी व नालायकी, उमेदवारीचा अर्ज, निवडणूक अधिकारी व त्यांचीं कामें, निवडणूक गुन्हे व शिक्षा, लाचलुचपतीचीं व बेकायदा कृत्यें आणि त्यामुळें उद्‌भवणाऱ्या नालायक्या, निवडणूक तक्रार-अर्ज, निवडणुकींतील इतर महत्त्वाच्या योजना, अशा नऊ प्रकरणांच्या ५६ पृष्ठांत श्री. कुलकर्णी ह्यांनीं कायद्याच्या भाषेची क्लिष्टता बाजूस ठेवून विवेचन केलें आहे. ही सर्व माहिती सर्वांना उपयुक्त असून पुस्तकाची किंमतहि सर्वांच्या आवाक्यांतील आहे.

* लेखकः- व. सी. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, पुणें. किं. १ रु.

## अमेरिकेंतील खाजगी विमानांची संख्या

अमेरिकेंत विमानानें वहातूक करणाऱ्या सुमारें ८०० कंपन्या आहेत. त्या सर्वांची मिळून १,४०० विमानें असून त्यांपैकी बहुतेक दोन किंवा अधिक एंजिन्स असलेलीं आहेत.

## हिंदी लोकशाहीसाठी सालिना दोन कोटी रुपये खर्च

### कांहीं आकडेवारी

स्वतंत्र भारतांतील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी किती खर्च येणार आहे, ह्याचा अंदाज करण्याचा प्रयत्न ई. एकॉनॉमिस्टनें केला आहे. निवडणुकींत एकूण ४,४१३ जागा भरल्या जाणार आहेत. त्यांचा तपशील असा:—

| | निवडणुकीच्या जागा प्रत्यक्ष | अप्रत्यक्ष |
|---|---|---|
| मध्यवर्ती पार्लमेंट | ४८९* | |
| राज्यांचीं सभागृहें | | |
| अ राज्यें | २,२९४ | |
| ब राज्यें | ७६१ | |
| क राज्यें | २२८ | |
| कौन्सिल ऑफ स्टेट्सच्या निवडणुकीसाठी क राज्यांचीं इलेक्टोरल कॉलेजें | ९० | |
| राज्य कौन्सिलांवरील निवडणुकीच्या जागा | ३४६ | |
| कौन्सिल ऑफ स्टेट्सवरील जागा | | २०५* |
| | ४,२०८ | २०५ |

ह्या सर्वच जागांसाठी नेहमीच निवडणूक लढवावी लागेल असें नाहीं; कांहीं प्रतिनिधी बिनविरोध येणें शक्य आहे. चालू निवडणुकींत काँग्रेस पक्ष जवळ जवळ सर्व जागा लढवील, सोशॅलिस्ट पक्ष जवळ जवळ निम्म्या जागा लढवील आणि बाकीच्या पक्षांचे वतीनें त्यामानानें कमी प्रमाणांतच जागा लढविल्या जातील. पक्षांची संघटना कमी-अधिक भक्कम व मोठी आहे, हें त्याचें एक कारण तर खरेंच. परंतु निवडणुकीसाठी येणारा खर्च हाहि निर्णायक महत्त्वाचा आहे.

ह्या लेखाचे शेवटीं एक तक्ता दिला आहे, त्यांत काँग्रेस-सारख्या बलवान पक्षाला येणाऱ्या खर्चाचा अंदाज करण्यांत आला आहे. ज्या मतदारसंघांत एकापेक्षां जास्त जागा आहेत, त्यांत फक्त एकाचाच खर्च कमाल मर्यादेपर्यंत होईल असें गृहीत धरलें आहे. त्यावरून, पार्लमेंटची निवडणूक जिंकण्यासाठी १ कोटी रु., राज्य असेंब्लींच्या निवडणुका जिंकण्यासाठीं २ कोटी रु. व कौन्सिल ऑफ स्टेट्सच्या निवडणुका जिंकण्यासाठीं २५ लक्ष रु. काँग्रेसला खर्च येईल असा हिशेब होतो. हा खर्च कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादा लक्षांत घेऊनचा आहे;* त्याबाहेर खर्च होणारच नाहीं असें नाहीं. ह्या उलट, मर्यादेइतका खर्च सर्वच उमेदवारांना करतां येईल असेंहि नाहीं, कांहीं ठिकाणीं काँग्रेसला प्रभावी विरोध होणार नाहीं आणि कांहीं बिनधोक ठिकाणीं फारसा खर्च करावाच लागणार नाहीं. ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या, तर काँग्रेसच्या तिकिटावरील उमेदवारांचा एकूण निवडणूक खर्च ३ कोटी रुपये होईल असा अंदाज करण्यास हरकत नाहीं.

काँग्रेस सोडून इतर पक्षांच्या उमेदवारांचा किती खर्च होईल, ह्याचा अंदाज करणें ह्यापेक्षाहि बिकट आहे. इतर पक्षांचें आर्थिक सामर्थ्य बरेंच कमी आहे. ते सर्व पक्ष मिळून ३ कोटी रुपये खर्च करतील असा अंदाज आहे; स्वतंत्र उमेदवारांचा मोठा खर्चहि त्यांत आला.

* मध्यवर्ती पार्लमेंटावरील ७ प्रतिनिधी व कौन्सिल ऑफ स्टेट्सवरील १२ प्रतिनिधी प्रेसिडेंटनी नियुक्त करावयाचे आहेत.

म्हणजे, सार्वत्रिक निवडणुकींचा एकूण खर्च खालीलप्रमाणें होईल:—

| | रु. |
|---|---|
| (१) मताच्या पेट्या, याद्या, टेलिफोनच्या सोयी, इत्यादींच्या खर्चाचा अंदाज | १० कोटी |
| (२) काँग्रेस पक्षाचा खर्च | ३ कोटी |
| (३) इतर सर्व पक्षांचा मिळून खर्च | ३ कोटी |
| एकूण | १६ कोटी |

सुमारें १७ ते १८ कोटी लोक मतदान करतील आणि ४,४१३ जागांसाठी निवडणूक होईल, हा व्याप लक्षांत घेतला तर इतर लोकशाही देशांचे मानानें हिंदी निवडणुका फारच कमी खर्चाच्या ठरतील, हें उघड आहे. दर ५ वर्षांनीं निवडणूक होणार व दर ऑक्टोबरला प्रतिवर्षी याद्या दुरुस्त होणार, त्यामुळें पुढील निवडणुकांचा खर्च कमी होत जाईल अशी अपेक्षा आहे. तो १० कोटी रुपये धरला तर हिंदी लोकराज्याची प्रत्यक्ष किंमत सालिना २ कोटी रुपये पडते.

### निवडणुकीचा खर्च

(लक्ष रुपयांचे आंकडे)

| | पार्लमेंट | | | असेंब्ली | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एक जागा विभाग | दोन जागा विभाग | तीन जागा विभाग | एक जागा विभाग | दोन जागा विभाग | तीन जागा विभाग | कौन्सिल ऑफ स्टेट्स विभाग | कौन्सिल विभाग |
| यू. पी. | १३·०० | ५·९५ | ... | २१·१२ | ९·९६ | ... | ... | १·८० |
| पंजाब | ३·०० | १·०५ | ... | ५·८८ | २·५२ | ... | ... | ०·९६ |
| मुंबई | ७·२५ | २·८० | ... | १५·५४ | ५·४० | ०·१६ | ... | १·८० |
| ओरिसा | ३·०० | १·४० | ... | ५·१८ | ३·९६ | ... | ... | ... |
| प. बंगाल | ४·७५ | २·१० | ०·४० | ९·५२ | ६·१२ | ... | ... | १·२६ |
| मद्रास | १२·२५ | ४·५५ | ... | १९·४४ | ७·९२ | ... | ... | १·८० |
| बिहार | ८·२५ | ३·८५ | ... | १७·७६ | ६·४८ | ... | ... | १·८ |
| आसाम | २·०० | ०·७० | ... | ६·४० | १·४० | ... | ... | ... |
| मध्य प्रदेश | ४·२५ | २·१० | ... | ८·१६ | ५·७६ | ... | ... | ... |
| म्हैसूर | १·७५ | ०·७० | ... | ३·०५ | १·९० | ... | ... | ०·९६ |
| मध्य भारत | १·७५ | ०·७० | ... | २·९५ | २·०० | ... | ... | ... |
| पेपसु | ०·७५ | ०·३५ | ... | १·६० | ०·८० | ... | ... | ... |
| राजस्थान | ४·०० | ०·७० | ... | ७·२० | २·४० | ... | ... | ... |
| त्रावणकोर-कोचीन | २·५० | ०·३५ | ... | ४·३० | १·१० | ... | ... | ... |
| हैद्राबाद | ४·२५ | १·४० | ... | ६·५४ | ३·९६ | ... | ... | ... |
| सौराष्ट्र | १·५० | ... | ... | २·०० | ०·४० | ... | ... | ... |
| क राज्यें | २·२९ | १·१० | ... | ... | ५·६४ | ... | ०·०४ | ... |
| एकूण | ७६·५४ | २९·३० | ०·४० | १३०·६४ | ६७·७२ | ०·१६ | ०·०४ | १०·३[illegible] |

**खाशी शिक्षा!**—अमेरिकेंतील डेट्रॉइट शहरांत दारू पिऊन बेफामपणें मोटार हाकल्याबद्दल एका मोटारवाल्याला अटक करण्यांत आली. त्याला पोलिस ठाण्यावर नेल्यावर शिक्षा काय करावी असा प्रश्न उपस्थित झाला. अखेर पुढील १० शनिवारीं त्यानें ठाण्यावर यावें आणि १५९ प्राणघातक अपघातांचा इतिहास लिहून काढावा अशी शिक्षा त्याला सांगण्यांत आली.

### चीनमधील अर्थव्यवस्थेचें स्वरूप

मुंबईचे प्रसिद्ध वृत्तपत्रव्यवसायी श्री. के. ए. अब्बास हे नुकतेच चीनहून परत आले आहेत. चीनमधील आर्थिक घडामोडींसंबंधीं त्यांनीं सांगितलेली माहिती भारताच्या सध्याच्या मिश्र अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें उद्बोधक आहे. मुंबईच्या वृत्तपत्रव्यवसायिकांपुढें आपले अनुभव सांगतांना श्री. अब्बास म्हणाले कीं चीनमधील कम्युनिस्ट राजवट भांडवलदारीचा नाश करण्यास तयार नाहीं; परंतु जमीनदारशाही मात्र तिनें रद्द केली आहे. सध्या त्या राजवटीचें ध्येय उत्पादन साधनांचें समाजीकरण करण्यांचें आहे. तें साध्य झाल्यावर मग कम्युनिस्ट आर्थिक कार्यक्रम अमलांत आणण्याचा विचार करण्यांत येणार आहे. जमिनीच्या धारणेंत सुधारणा घडवून आणल्यामुळें चीनमध्यें धान्याचें उत्पादन दुपटीनें वाढलें आहे. औद्योगिक क्षेत्रांत चीन मागासलेलाच आहे. तथापि संपूर्णपणें चिनी बनावटीची पहिली मोटारगाडी नुकतीच तयार करण्यांत आलेली आहे. अमेरिकन मोटारीच्या तुलनेनें ती अगदींच ओबडधोबड होती, पण तीं पळूं शकत होती! चीनचें औद्योगीकरण करण्याच्या कामीं खाजगी भांडवलदारांचा उपयोग होईल असें चिनी कम्युनिस्टांना वाटतें. चीनमधील अवजड यंत्रसामग्री तयार करण्याचे कारखाने कुंग, चँग, चेंग, आणि सूंग ह्या चार कुटुंबांच्या मालकीचे होते. ते मात्र राष्ट्राच्या मालकीचे करण्यांत आले आहेत. लहान कारखान्यांच्या क्षेत्रांत मात्र खाजगी मालकीचे व सरकारी मालकीचे असे दोन्ही प्रकारचे कारखाने आहेत. चीनमध्यें कोमिंटँगचें राष्ट्रीय सरकार होतें त्यावेळीं कांहीं कारखानदारांना आपल्या भांडवलावर २॥ टक्के सुद्धा नफा सुटत नसे. जपानची सत्ता असतांना त्यांना नफाही वाटतां येत नसे. परंतु आतां त्याच छोट्या कारखानदारांना आपल्या भांडवलावर ६ टक्क्यापेक्षां अधिक नफा सुटत आहे.

---

**हिरोशियाच्या नागरिकांना साखर**—हिरोशिया ह्या जपानी शहरावर अणुबाँब टाकल्यानें हजारों जपानी नागरिकांना इजा पोचली. हॅवाना शुगर केन प्लँटर्स असोसिएशननें वरील नागरिकांसाठी ४० हजार डॉलर्स किंमतीची साखर देणगीदाखल देण्याचा ठराव केला आहे.

**ॲसबेसटॉसचें उत्पादन वाढविण्यासाठी**—मद्रास राज्यांत कुडावा येथें ॲसबेसटॉसच्या खाणी आहेत. ह्या खाणींचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न मद्रास सरकार करीत आहे. भारतांत सध्या ह्या खनिजाची टंचाई असून तें परदेशाहून आयात करावें लागत आहे. भारतीय ॲसबेसटॉसची प्रत मात्र उच्च आहे.


**भारताला ऑस्ट्रेलियाकडून मदत**—दक्षिण आशियाला मदत देण्यासाठी आखण्यांत आलेल्या कोलंबो योजनेप्रमाणें भारताला ऑस्ट्रेलियाकडून अन्नविषयक साहाय्य मिळणार आहे. ऑस्ट्रेलिया भारताला ४५,००० टन गहूं आणि १८,००० टन आटा देणार आहे. गहूं चालू वर्ष-अखेर मिळणार आहे. दोन्ही पदार्थांची किंमत सुमारें २६,४०,००० ऑस्ट्रेलियन पौंड आहे.

**गुन्हेगारांना सुधारण्यांत यश**—चीनमधील तुरुंगांत असणाऱ्या राजकीय कैद्यांकडून काम करून घेऊन त्यांची सुधारणा करण्यांत चीनच्या सरकारला यश आलें आहे असें समजतें. एका तुरुंगातील राजकीय कैद्यांनीं टॉवेल्सचें मासिक उत्पादन ५१६ डझनावरून १,०२८ डझनापर्यंत वाढविलें. दुसऱ्या एका तुरुंगांत मासिक १५८ बुटांच्या जोड्यांचें उत्पादन २,२४३ जोड्यांपर्यंत वाढलें.


ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay




पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी
दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.
६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
★ प्रमाणशीर खर्चीत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★
सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

## उत्तर-प्रदेशांतील लाखेचा धंदा

**मूळ उत्पादकाला योग्य किंमत देण्याची योजना**

उत्तर-प्रदेशांतील मिर्झापूर जिल्ह्यांत लाख तयार करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. ह्या धंद्यांतील मूळ उत्पादकांना जास्तींत जास्त फायदा व्हावा म्हणून राज्य-सरकारनें उपाय-योजना केली आहे. आतांपर्यंत कच्ची लाख एखाद्या खाजगी कंपनीला विकली जात असे. ही कंपनीच लाखेच्या कांड्या तयार करण्याचें काम करीत असे. खरेदीची मक्तेदारी कंपनीकडे असल्यामुळें मूळ उत्पादकाला त्याच्या मालाची फारच कमी किंमत मिळे. आतां सरकारनें असें ठरविलें आहे कीं कच्च्या लाखेची पक्की लाख तयार करण्यासाठी उत्पादकांच्या सहकारी संस्थाच स्थापन करण्यांत याव्या. परंतु सहकारी सोसायट्या स्थापन होण्यास थोडासा कालावधि लागणार आहे. तोंपर्यंत प्रॉव्हिन्शिअल मार्केटिंग अँड डेव्हलपमेंट फेडरेशनकडे वरील काम सोपविण्यांत आलें आहे. कच्ची लाख गोळा करण्याच्या पद्धतींत बदल करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. प्रांतांतील लाखेच्या झाडांची मोजदाद करण्याचें व त्यांची वाटणी करण्याचें काम तातडीनें करण्याचे हुकूम देण्यांत आले आहेत. लाखेच्या उत्पादकाला बाजारभावांतील चढउतारांचा फायदा घेतां यावा म्हणून ही नवीन पद्धत अंमलांत आणण्यांत येणार आहे. तथापि प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या कामाला एप्रिल, १९५२ पासून प्रारंभ होणार आहे, असें समजतें. उत्पादकांच्या सहकारी संस्था काढून मूळ उत्पादकाला आपल्या श्रमाचा जास्तींत जास्त मोबदला देण्याची कल्पना सहकारी चळवळीच्या आवश्यक भागांपैकीच आहे. परंतु शेती अगर तत्संबंधी मालाचे मूळ उत्पादक हे संघटित नसतात; त्यामुळें बाजारपेठांचा कानोसा ठेवून अधिकांत अधिक किंमती मिळविणें त्यांना अवघड जातें. त्यांतहि जंगलाशीं संबंध असलेले मूळ उत्पादक तर अधिकच परावलंबी असतात. त्या दृष्टीनें उत्तर-प्रदेश सरकारनें सुरू केलेला हा नवीन प्रयोग लक्ष ठेवण्यासारखा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

**आंतरराष्ट्रीय आकडेशास्त्र परिषद**—चालू महिन्यांत दिल्ली येथें एक आंतरराष्ट्रीय आकडेशास्त्र परिषद भरविण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्या परिषदेला ब्रिटन, अमेरिका, चीन, इत्यादि ३२ राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर रहाणार आहेत. संयुक्त-संघटनेतर्फे १५ प्रतिनिधी हजर रहाणार आहेत असें समजतें.

**विजेच्या मीटर्सचा कारखाना**—जयपूर मेटल् इंडस्ट्रीज ह्या कारखान्यांत विजेचे मीटर्स तयार करण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत येत आहे. अशा प्रकारची यंत्रसामुग्री भारतांत पहिल्यानेंच उभारण्यांत येत आहे असें समजतें. कारखाना चालू झाल्यावर दरमहा १०,००० मीटर्स तयार होतील असा अंदाज आहे.

**भारतासाठी कोरडें दूध**—भारतामधील दुष्काळी परिस्थिति लक्षांत घेऊन डेन्मार्कनें भारताला २ टन दुधाची भुकटी देण्याचें ठरविलें आहे. हा माल घेऊन येणारी एक बोट मद्रासला व दुसरी मुंबईला येणार आहे.

**बहुप्रसवा मातांना उत्तेजन**—पुष्कळ मुलें होणाऱ्या मातांना सन्मानपदकें देण्याचें कमेनअन सरकारनें ठरविलें आहे. पहिल्या प्रतीचें पदक १० किंवा अधिक मुलें होणाऱ्या मातांना आणि दुसऱ्या प्रतीचें पदक ७ ते ९ मुलें होणाऱ्या मातांना देण्यांत यावयाचें आहे. ५ ते ६ मुलें होणाऱ्यांना तिसऱ्या प्रतीचें पदक देण्यांत येणार आहे


फोनः ३४५१९ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लांकूड आणि कोळसा वगैरे.

---

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९९,३८५ |

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

## मोहाचीं फुलें

लेखक:- ग. वा. देवधर, बी. ए., एम. एस्सी., अहमदाबाद

भारतांत मोहाच्या झाडांचीं रानें आहेत. तीं झाडें विशेषत: गुजराथ, खानदेश, मध्यप्रदेश, वगैरे भागांत वाढतात. मोहाचीं फुलें गोड व रुचकर असतात. त्यांपासून उत्तम मद्यार्क (alcohol) तयार होतो. तशीच दारूही होते. सध्यां दारूबंदी असल्यामुळें आवश्यक प्रमाणांत मद्यार्क बनविल्यावर राहिलेलीं फुलें जवळ जवळ वायाच जातात. कांहीं अंशीं गुरांचें खाद्य म्हणून त्यांचा उपयोग केला जातो.

मोहाच्या फुलांत डेक्स्ट्रोज्, लेव्ह्युलोज्, माल्टोज्, सक्रोज् (उसाची साखर) व पेन्टोजिस् मिळून एकंदर शेंकडा ६० ते ७० टक्के शर्करा असते. एक हंड्रेडवेट फुलांपासून सहा गॅलन शुद्ध मद्यार्क मिळतो. मोहाचीं फुलें थंड, बलवर्धक व पौष्टिक आहेत.

प्रतिवर्षी हातांत येणाऱ्या सर्व मोहाच्या फुलांपासून शुद्ध मद्यार्क बनविल्यास त्याचा पेट्रोलमध्यें मिसळून मोटारींचें जळण म्हणून उपयोग होऊं शकेल. पण, सध्यांतरी तशी शक्यता दिसत नाहीं. तरी या वाया जाणाऱ्या फुलांचा आणखी कांहीं उपयोग होण्यासारखा आहे कीं काय तें पाहाण्यासारखें आहे.

आजारी माणसांसाठीं अन्न म्हणून मोठ्या प्रमाणांत ग्ल्यूकोज (डेक्स्ट्रोज्) वापरण्यांत येतो. तो सर्व परदेशांतून येतो. मोहाच्या फुलांत शेंकडा ६० टक्के पर्यंत ग्ल्यूकोज असल्यामुळें तो थोड्या खर्चांत काढतां येऊन त्याचा उपयोग वरील कामांसाठीं करितां येईल.

मोहाच्या फुलांत आणखी कांहीं उपयुक्त पदार्थ आहे कीं काय तें पाहाण्यासारखें होतें. परंतु, दारूबंदी असल्यामुळें त्यांवर प्रयोग करण्यासाठीं सरकारी परवाना मिळविणें आवश्यक होतें. तसा परवाना डायरेक्टर ऑफ एक्साइज अँड प्रोहिबिशन, मुंबई, यांच्या कृपेनें मिळाला.

मोहाचीं वाळलेलीं फुलें तपासून पाहातां त्यांत दर १०० ग्रॅममध्यें अदमासें ३३ मिलिग्रॅम व्हिटॅमिन् सी असल्याचें आढळून आलें. कोणत्याहि पदार्थांतील व्हिटॅमिन् सी चें प्रमाण तो वाळल्यावर व प्राणवायूचें सान्निध्यांत कमी होत असतें. वर दिलेलें प्रमाण वाळलेल्या व कित्येक दिवस उघड्यावर पडलेल्या फुलांतील असल्यामुळें ताज्या फुलांत तें अधिक असण्याचा संभव आहे. म्हणून मोहाच्या फुलांच्या हंगामांत ताजीं फुलें गोळा करून त्यांतील व्हिटॅमिन् सी चें प्रमाण तेथेंच काढणें अधिक श्रेयस्कर होईल. तसा प्रयत्न सरकारी अनुज्ञेनें करण्याचा विचार आहे.

---

### इंपीरिअल बँकेस मिळणारें कमिशन

इंपीरिअल बँकेंतील सरकारी खात्यांतील उलाढालींवर रिझर्व्ह बँकेनें इंपीरिअल बँकेस खालील दरानें कमिशन देण्याचें मान्य केलें आहे. ३१ मार्च, १९५५ अखेर हे दर अंमलांत राहतील.

| उलाढाल | कमिशनचा दर |
|---|---|
| पहिले १५० कोटी रु. | $\frac{1}{16}$% |
| पुढील ३०० कोटी रु. | $\frac{1}{32}$% |
| पुढें | $\frac{1}{64}$% |

एका वर्षांत १२०० कोटी रुपयांवर उलाढाल झाली, तर १२०० कोटी रुपयांवरील पुढच्या उलाढालीस $\frac{1}{128}$% कमिशन मिळेल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा : ३, ५, १० वर्षे सिल्व्हर
१ दादर ज्युबिली सर्टिफिकिटें
२ माहीम दर ९३-८, ८७-८, ७५ अनुक्रमें.
३ बेळगांव हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

## " य एषु सुप्तेषु जागर्ति "

### ऑडिटरांचें निष्ठुर कर्तव्य

(श्री. जी. पी. कपाडिया, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष)

वर्षांतून एकदां येऊन हिशेबाचीं पुस्तकें पहाणारा आणि नोंदींच्या खरेखोटेपणाबद्दल बेफिकीर राहून तांबड्या, निळ्या व हिरव्या पेन्सिलीनें टिका मारत जाणारा गृहस्थ म्हणजे ऑडिटर, ही कल्पना वस्तुस्थितीस सोडून आहे. जो एकादा ऑडिटर ऑडिटचें काम जाईल ह्या भीतीनें वागतो, त्याच्या कार्यपद्धतीमुळें वरील प्रकारची कल्पना निर्माण होते. स्वतंत्र वृत्तीचा, निर्भीड व स्पष्टवक्ता ऑडिटर असेल आणि काम चालू राखण्याच्या दृष्टीनें तो वागत नसेल, तरच त्याच्या व्यवसायाची खरी छाप तो बसवूं शकतो. चार्टर्ड अकौंटंटस्च्या बहुतेक सर्वांची ही वृत्ति असली पाहिजे, अशी माझी खात्री आहे. म्हणजे, बाहेरच्या लोकांना ऑडिटरांबद्दल अनुदार उद्गार काढण्यास संधीच मिळणार नाहीं. आपल्या गिऱ्हाइकांची " सोय " पाहून देणाऱ्या ऑडिटरास ह्या व्यवसायांत स्थान मिळताच कामा नये.

ऑडिटरांनीं नेहमीं जागरूक राहून, केव्हांहि, कोणत्याहि प्रकारें, कोठेंहि, कमकुवतपणा दाखवता कामा नये. ऑडिटरांच्या संघटनेनें बोधचिन्ह म्हणून गरुडाची निवड केली आहे. हा पक्षी ढगांवरून विहार करतो; त्याची नजर सूक्ष्म असते. आपलें बोधवाक्य " य एषु सुप्तेषु जागर्ति " असें आहे. कठोपनिषदांतून तें घेतलेलें असून त्याचा अर्थ " बाकीचे सर्व झोपी गेले, तरी जागा असणारा ", असा आहे. ऑडिटरांच्या व्यवसायांत अत्यंत जागरूकपणा लागतो. ऑडिटरांनीं ह्या बोधवाक्यास साजेसा उच्च दर्जा राखण्याची शिकस्त केली पाहिजे.

ऑडिटमध्यें आढळणाऱ्या दोन टोकांच्या मतांमध्यें योग्य सुवर्णबिंदु काढला पाहिजे, असें कांहीं ऑडिटरांना वाटतें. कंपनी किंवा तिचे अधिकारी ह्यांचे हातून कांहीं चुका झाल्या असतील तर त्या स्पष्ट, निःसंकोच पुढें मांडणें, हें ऑडिटराचें कर्तव्य आहे. एका कामास दोन ऑडिटर नेमलेले असले, म्हणजे त्यांपैकीं एकानें व्यवस्थापकांची बाजू घेऊन दुसऱ्या ऑडिटरच्या विरुद्ध युक्तिवाद लढविल्याचीं उदाहरणें घडतात. जॉइंट ऑडिटमध्यें, दोघा ऑडिटरांनीं एकत्र यावें, भिन्न मतें देऊं नयेत, हें इष्ट आहे. अर्थात्, त्यांतील एकानें अगदींच अडेलतट्टूपणा केला तर गोष्ट वेगळी. तडजोडीच्या प्रयत्नामुळें ऑडिटर कित्येक वेळां अडचणींत सापडतो. ऑडिट टिकविण्यासाठीं धडपड करणारा ऑडिटरच अशा तडजोडीच्या वृत्तीस बळी पडतो.

ऑडिटरच्या व्यवसायांत लायकीस, फक्त लायकीसच, महत्त्व दिलें पाहिजे हें तर खरेंच. परंतु ती हुशारी परदेशांतून आयात करण्याची बिलकूल आवश्यकता नाहीं. भारतांत हुशारी

किंवा बुद्धिमत्ता ह्यांचा अभाव नसून केवळ योग्य संधीच्या अभावीं ह्या व्यवसायांतील खरी लायकी उघड दिसूं लागलेली नाहीं. इतर देशांतील ऑडिटरांपेक्षां आपल्या ऑडिटरांचें ज्ञान कोणत्याहि प्रकारें कमी नसून कदाचित् तें ज्यास्तहि भरेल, असें सामान्यतः म्हणता येईल. हिंदी ऑडिटरास योग्य संधि मिळूं दिली न गेल्यामुळें, कृत्रिम वातावरण निर्माण करण्यांत आल्यामुळें व त्याच्याविरुद्ध गैरसमज पसरविण्यांत आल्यामुळें वस्तुस्थितीचें योग्य दर्शन घडूं शकलेलें नाहीं. परंतु वस्तुस्थितीचें वास्तव चित्र कायम लपवून ठेवतां येणें अशक्य आहे. गेल्या कांहीं वर्षांत तें चित्र दिसूं लागलें असून लवकरच हिंदी ऑडिटरांची लायकी व उच्च दर्जा हीं सुस्पष्ट होतील.

व्यापारी व कारखानदार तपशील देण्यास नाखूष असतात; अगदीं कायद्यानें जेवढा तपशील आवश्यक ठरविलेला असेल, त्याच्यापेक्षां जास्त माहिती देण्यास ते तयार नसतात. परंतु ऑडिटरानें त्यांना समजावून सांगितलें, तर त्याचा सल्ला ते मानीत नाहींत, असें सहसा घडत नाहीं. धंद्यांतील गुप्त गोष्टी जोंवर उघड केल्या जात नाहींत, तोंवर धंद्याच्या खऱ्या मालकापासून कोणतीहि बाब लपवून ठेवली जातां कामा नये. अनावश्यक बाबींचा उल्लेख नसला तरी चालेल. परंतु गुप्त गोष्टी फुटूं नयेत ह्या सबबीखालीं आवश्यक अशा बाबीहि लपविल्या जातात हें गैर आहे. ऑडिटरांपैकीं एकाद–दुसरा जरा लवचीकपणा दाखवितो आणि मग व्यापारी–कारखानदार सर्वच ऑडिटरांशीं हुज्जत घालूं लागतात. सर्वांनींच विशिष्ट तत्त्वें पाळण्याचें ठरविलें, तर ऑडिटिंगच्या व्यवसायांत एकवाक्यता येऊं शकेल. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटसच्या कौन्सिलनें अकौंटिंगविषयक कांहीं रूढी व अर्थ निश्चित ठरवून मार्गदर्शनासाठीं त्याचें पुस्तक छापून काढावें, म्हणजे बरें होईल.

---


**KIRLOSKAR BROTHERS, LTD., KIRLOSKARVADI, Dist. South Satara.**

# NOTICE

Notice is hereby given that the **Thirtyfirst Annual General Meeting of the Share-holders of Messrs. Kirloskar Brothers, Ltd.**, will be held at Kirloskarvadi, Dist. South Satara, in the Business Office of the Company on Saturday, the 29th day of December, 1951, at 3–30 P. M. (S. T.) to transact the following business, viz:—

1. To receive and adopt the annual statements of account, the balance-sheet and the report of the Directors and Auditors thereon, made up to 31st July, 1951.

2. To sanction the declaration of a dividend.

3. (a) To elect Directors in the places of Shrimant Sardar Jagannath Maharaj Pandit, Dr. D. S. Sardesai and Mr. V. P. Varde, who retire by rotation; but being eligible for re-election, have offered themselves accordingly for re-election.

   (b) To elect a Director in the place of Shri. Shrikrishna B. Kher who retires under Article No. 104; but being eligible for election, has offered himself accordingly for election.

4. To propose and pass the following Resolution as an ordinary Resolution:—

"Resolved that out of the sums standing to the credit of the Reserve Fund the sum of Rs. 7,56,187–8–0 be capitalised and be applied in making payment in full at par of 30,247½ shares of Rs. 25/– each in the Capital of the Company and that such shares be distributed as fully paid among the persons who were registered as holders of Ordinary shares in the Company on 22nd December 1951, in the proportion of one such fully paid share for every two such ordinary shares of Rs. 25/– each held by such holders respectively as aforesaid and that such fully paid shares do rank for dividend along with the existing shares in any dividend which may be declared in respect of the year ending with the 31st day of July 1952 and that the shares as distributed be treated for all purposes as an increase of the nominal amount of the Capital of the Company held by each such member and not as income.

And that for the purpose of giving effect to the above Resolution, the Directors may issue fractional certificates and generally make such arrangements for the allotment of such shares as they think fit and may settle any difficulty or question which may arise in regard to such distribution.

And further that prior to the said allotment or distribution, the Directors may authorise any person on behalf of the holders of existing Ordinary shares to enter into an Agreement

with the Company providing for the allotment to them of the said Ordinary shares as fully paid-up in satisfaction as aforesaid, and the agreement made under such authority shall be effective."

5. To pass the following Resolution which will be proposed at the meeting as a **Special Resolution**, viz.—

"RESOLVED that the agreement of Managing Agency dated 1st day of May 1950 made between the Company and Messrs. Kirloskar Sons & Co., as therein defined be and the same is hereby varied as from the 1st day of August, 1951, as follows:—

That as from the 1st day of August 1951, the said firm of Messrs. Kirloskar Sons & Co shall be paid in addition to the allowance referred to in clause 5 (a) of the said Agreement of Managing Agency a commission calculated at the rate of 15% on the net profits made by the Company in every year or any shorter period for which accounts are made up and placed before the General Meeting, if the net profits for the year or such shorter period are sufficient to declare a dividend at the rate of 4% (Four per cent) on the amount of the paid-up Capital of the Company for the time being.

"Net profits" for this purpose are to be arrived at after allowing all working expenses and depreciation but without reduction in respect of income-tax or super-tax or any other taxes, assessments or allocation to reserve and any other funds whatever.

The commission aforesaid shall be paid at the end of every financial year within eight (8) days of the passing of the annual or other accounts as aforesaid.

AND RESOLVED further that draft of the Supplementary Agreement between the Company and the Managing Agents, Messrs. Kirloskar Sons & Co., embodying the variations effected by sub-clause (1) of this Resolution initialled by the Chairman and produced at this meeting be engrossed and sealed or executed on behalf of the Company in manner prescribed by the Articles of Association of the Company and it is hereby expressly resolved and declared that the variations aforesaid shall take effect forthwith on the passing of this Resolution irrespective of the date on which the said Agreement may be sealed or executed. The variations aforesaid shall not take effect unless approved by the Central Government, under Sec. 87CC (i) (b) (i) of the Indian Companies Act."

6. To appoint the Auditor or Auditors and to fix their remuneration.

The transfer books and the Register of Members of the Company will remain closed from 22nd day of December, 1951 to 5th day of January, 1952 (both days inclusive).

**Kirloskarvadi,**

Dated this 21st day of November, 1951.

*By order of the Board*

**KIRLOSKAR SONS & CO.**

Managing Agents.

---

*Note*:- (1) The original Agreement of Managing Agency dated 1st of May 1950 and a draft of the proposed Supplementary Agreement varying the Original Agreement of Managing Agency can be inspected at the Registered Office of the Company on any working day during the hours of 12-30 P. M. and 4-30 P. M.

(2) After the sanction of the Dividend in the above General Meeting, for the convenience of share-holders, the Dividend Warrants or the Money-orders for the amount of the dividend will be sent after the 15th February 1952 to those share-holders whose names are on the Register on the 29th December 1951, serially according to the alphabetical order.

(3) If the amount of dividend exceeds Rs. 50/- the Dividend Warrants on the Bombay Provincial Co-operative Bank, Ltd., Branch Kirloskarvadi, will be sent and the amount of Dividend of Rs. 50/- or less will be remitted by Money-orders.

(4) The share-holders should immediately communicate to the Company for the change in their address.

### दि को. पीपल्स बँक लि., लिंब (जिल्हा सातारा)

ह्या बँकेचें कार्यक्षेत्र लिंब व गोवे गांव आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें ४,६१,७६६ रु., चा व्यवहार केला असून १,३९१ रु नफा मिळविला आहे. सभासद संख्या ८४, शेअर भांडवल १३,००० रु, ठेवी २३,००० रु., कॅश क्रेडिट १२,८९६ रु., तारण गहाण ६०७८ रु., इत्यादि ताळेबंदांतील प्रमुख आकडे आहेत. हुंडी, चेक, रेल्वे रसिदी, इत्यादींचा १ लक्ष रु. चा व्यवहार बँकेनें करून. १९८ रु. कमिशन मिळविलें. वार्षिक सभेस ८४ पैकीं ५० सभासद उपस्थित होते. १९५५ सालीं बँकेचा ज्युबिली समारंभ करण्यांत येणार आहे. सेक्रेटरी श्री. बा. ग. अभ्यंकर ह्यांच्या चिकाटीबद्दल अध्यक्ष, सरदार पंडितराव ह्यांनीं प्रशंसोद्गार काढले. बहुसंख्य निरक्षर अशा खेड्यांत प्रतिकूल परिस्थितीस तोंड देऊन चालकांनीं बँकिंगच्या व्यवसायाचा फायदा जनतेस उपलब्ध करून दिला आहे. अशा उपक्रमास व्यापक प्रसिद्धि व प्रोत्साहन मिळणें आवश्यक आहे. भागीदारांना ६% डिव्हिडंड देण्याचें ठरलें. (चेअरमन : त्रिं मा. ठाकूर. सेक्रेटरी : बा. ग. अभ्यंकर.)

### माथेरान को. बँक लि., माथेरान

वसूल शेअर भांडवल ४७,१८० रु., ठेवी ५२,१०२ रु., रिझर्व्ह फंड ४,३८६ रु., येणें कर्ज १,२३,५०५ रु., असे ह्या बँकेच्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे आहेत. एकूण सभासद संख्या ३३३ आहे. अहवालाच्या वर्षी बँकेनें चालू खातें सुरू करून बँकिंगच्या कामास प्रारंभ केला. ह्या खात्याची उलाढाल ३५,००० रु. पर्यंत झाली आहे. शेअर भांडवलाहि १२,००० रु. नीं वाढलें आहे. अहवालाचे वर्षी बँकेस नक्वळ नफा ३,७२१ रु. झाला. श्री. भाऊसाहेब राऊत व कै. वि. ह. कोतवील, बी. ए., एलएल. बी., ह्यांनीं प्रस्तुत बँकेची १९३९ मध्यें स्थापना केली, तिची प्रगति होत आहे. (चेअरमन : सखाराम श्रीपत चव्हाण. मॅ. डायरेक्टर : गोपाळ मल्हारी शिंदे.)

### मुं. सहकारी बँकेच्या राहुरी शाखेखालील सोसायट्यांची सभा

दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि., राहुरी या शाखेखालील सोसायट्यांची तृतीय वार्षिक साधारण सभा मे. एस. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

सभेंत शाखेचा ताळेबंद, अहवाल, तपासणी यादी, पोट नियम दुरुस्ती व मॅनेजिंग कमिटीची निवड वगैरे कामें झालीं. सभेंत समारोपाचे भाषणांत मे. स. ज. बूच, सीनिअर इन्स्पेक्टर, नगर भाग, नगर यांनीं दिलेल्या कर्जांचा आढावा घेतला. तसेंच शेतकऱ्यांनीं कर्जाची (नवे–जुने करण्याची) पद्धत सोडून देऊन नवीन कर्जें घेऊन उत्पादन केलेल्या मालाचा सहकारी खरेदी विक्री संस्थेमार्फत विनिमय करून घ्यावा व त्यांचेमार्फत उत्पादनासाठी लागणारा माल घ्यावा, असें सांगितलें. त्यानंतर श्री. पवार यांनीं तेलाच्या फॅक्टरीच्या योजनेबद्दल थोडक्यांत विवेचन करून या तालुक्यांत त्या फॅक्टरीची जरूरी असून व त्यापासून होणाऱ्या फायद्याबद्दल थोडक्यांत माहिती सांगितली.

### रशिआंतील पीकपाणी

सो. रशिआंत यंदा पीकपाण्याची सुबत्ता असल्याची वार्ता आहे. मका, राय इत्यादींसारख्या निकृष्ट प्रकारच्या धान्याच्या ऐवजीं गहूं लावण्यासाठी रशिअन सरकारकडून प्रयत्न करण्यांत येत होते. त्या प्रयत्नांना चांगलें यश आलें असून त्यामुळेंच ब्रिटनशीं करण्यांत आलेल्या व्यापारी करारांत रशिआनें पूर्वीपेक्षां अधिक गहूं देण्याचें कबूल केलें आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०–६–५१ अखेर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. १,६५,००० |
| ठेवी | रु. ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २–०–० |
| चालू डिपॉझिट | „ | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन).

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन

अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर

बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया

गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शाहा

पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया

रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

श्री. अरविंदो युनिव्हर्सिटी सेंट्रल फंडासाठीं वर्गणी बँकेच्या सर्व कचेऱ्यांत स्वीकारली जाते.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.